जा.क्र.मसंकें/सवि/३४/1171/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक :— 0 3 APR 2023

प्रती

प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

**विषय:—सडवे विभागामध्ये सुकी काजू बी गोळा करणे आणि भात लागवड करणे इ.कामे ठेक्यावर करण्याच्या जाहिरातीस विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिद्धी देण्याबाबत....**

उपरोक्त विषयानुसार मध्यवर्ती संशोधन केंद्र, सुकी काजू बी गोळा करणे आणि भात लागवड करणे इत्यादी कामे ठेक्यावर करावयाची आहेत. तरी याबाबतची जाहिरात विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (www.dbskkv.org) प्रसिद्ध करावी.

सोबत : वरीलप्रमाणे

**संचालक,**
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
# सडवे विभाग

जा. क्र मसंके/प्रअस/दरपत्रक/34/1172/२०२३. दिनांक. 03 APR 2023

# नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत सडवे विभागामध्ये सुकी काजू बी गोळा करणे आणि भात लागवड करणे इ.कामे करून घेण्यासाठी ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची कामे ही दिनांक 20.04.23 ते दिनांक १५.०७.२०२३या कालावधी मध्ये करावयाची असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क | कांमांचा तपशिल |
|---|---|
| १ | सुकी काजू बी गोळा करणे,सुकी काजू बी पासून बोंडे वेगळी करणे, सुकी काजू बी उन्हात ३ वेळा सुकविणे. |
| २ | भात लागवडीकरिता गादी वाफे तयार करणे, पेरणी करणे, बांध बंदिस्ती करणे, रोपवाटीकेत बेणणी करणे, रोपांची वाहतूक करणे व भात रोपे लागवड करणे,रोपवाटीकेत आणि भात रोपे लागवड करताना खते घालणे |

वरील प्रमाणे कामे करण्यासाठी ठेकेदारांनी एकूण कामाच्या स्वरूपाची पाहणी प्रत्यक्ष करुन आपली दरपत्रके दिनांक. 19.04.2023 पर्यंत बंद लखोटयामध्ये संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली ता. दापोली,जि. रत्नागिरी यांचेकडे सादर करावे. याबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

- ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर एकूण कामाचे स्वरुप पाहून दर पत्रकामध्ये दर सादर करावेत.
- ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूर आदेश पत्राव्दार ेदिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभागप्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सूचनेनूसार व त्यांचे देखरेखीखाली ठेक्याचे काम करावयाचे आहे.
- ठेकेदारांने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा एफ न/१३(१)२०१७.एल एस—११ दिनांक १७.०३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरा नुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेकेदाराचे देयक कार्यालयास सादर करते वेळी देयका सोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयका सोबत नसल्यास देयकाची अदायगी करता येणार नाही.
- कामाची अदायगी महिना/कामपूर्ण झाल्यावर करण्यात येईल/ ठेका संपल्या नंतर करण्यात येईल. संबधित देयक सादर करताना विभाग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे कडील कामे वेळेत पूर्ण केले बाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहिल.
- ठेका अपूर्ण सोडल्यास ठेकाच्या बीलांची आदायगी होणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्या वेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबधीत ठेकेदाराचे दरपत्रक / निविदा पुढील ठेक्याच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबधीत कार्यालयामार्फत केला जाईल.
- पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्या नंतर दररोज संबधीतांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरुस्त झाल्यास दुरुस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकामधून वसूल केला जाईल.

- प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचने नुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल. आणि त्याबाबत ठेकेदारांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणा रनाही.
- ठेकेदाराने पॅनकार्ड व बॅक खाते जोडणे बंधनकारक आहे.ठेकेदाराच्या देयकांची अदायगी त्यांचे बॅक खाती एन ई एफ टी/ आर. टी. जी. एस. /धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.
- ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामागारांना अपघात/ सर्पदंश/विचूंदंशझाल्या संबधीत कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारांची राहिल.त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.
- कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/ मंजूराकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबधीत नुकसानीची किंमत वसूल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारवर कायदेशीर कार्यवाहीकरण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांना असेल.
- ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्याच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारांस बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारांस देण्यात आलेला ठेका कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र एस.एस.पी.५४५३/९० नुसार ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेकाकालवधीनंतर विद्यापीठ /शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.
- ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्तीमान्य असले बाबत करार लिखित स्वरुपात करणे बंधन कारक राहिल. कंपनी /संस्थतर्फे/ ठेकेदारा मार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांचे ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत, माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी:—

१. नोटीस बोर्डवर लावण्यासाठी
२. ग्रामपंचायत कार्यालय सडवे/असोंड/शिवाजीनगर, साखळोली/गावतळे